# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/12/2023 (रविवार) सकाळ


---

## सोलार कंपनी बाजारगाव येथील प्लॅन्टमधील स्फोटात नऊ लोकांचा मृत्यू

आज दिनांक १७/१२/२०२३ रोजी पोलीस स्टेशन कोंढाळी हद्दीतील सोलार कंपनी मधील एका प्लॅन्टचे बिल्डींगमध्ये ब्लास्ट झाला असुन सदर बिल्डींग ब्लास्ट मध्ये ध्वस्त झाली असुन त्यामध्ये काम करणारे खालील प्रमाणे नऊ इसम मरण पावलेले आहे.

नावे –

१) युवराज किसनाजी चारोळे रा. बाजारगाव ता. जिल्हा. नागपूर ग्रा.

२) ओमेश्वर किसनलाल मच्छिरके रा. चाकडोह पो. बाजारगाव ता. जिल्हा. नागपूर

३) मिता प्रमोद उईके रा. अंबाडा सोनक ता. काटोल जि. नागपूर ग्रा.

४) आरती निलकंठ सहारे रा. कामठी पोस्ट मासोद ता. काटोल जि. नागपुर ग्रा.

५) श्वेताली दामोधर मारबते रा. कन्नमवार ग्राम ता. जिल्हा. वर्धा

6) पुष्पा श्रीरामजी मानापुरे रा. तेलीपुरा शिराळा अमरावती

७) भाग्यश्री सुधाकर लोणारे रा. भुजतुकुम मुळझा ब्रम्हपुरी जि. चंद्रपुर

८) रूमीता विलास उईके रा. ढगा पोस्ट कन्न्मवार ता. कारंजा जि. वर्धा

९) मोसम राजकुमार पटले रा. नेहरू वार्ड पो. पाचगाव ता. मोहाडी जि. भंडारा

ज्या ठिकाणी ब्लास्ट झाला तो एरिया त्वरित सिल करण्यात आला असुन फॅक्टरी मधील काम त्वरीत बंद करण्यात आले आहे. सदर ठिकाणी माहीती मिळताच तात्काळ विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपुर परिक्षेत्र श्री. छेरींग दोरजे, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण श्री. संदीप पखाले हे त्वरीत घटनास्थळी हजर आले असुन रॉयट कंन्ट्रोल टीमला पाचारण करण्यात आले आहे.

घटनास्थळावर बॉम्बशोध पथक तसेच फॉरेन्सीक लॅब टीमचे कडुन बारकाईने शोध सुरू आहे., घटनास्थळी सकाळी १०.०० वा पासुन वरिष्ठ अधिकारी हजर आहेत.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर